# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**कोल्हापूर जिल्हापरिषदेच्या सरळ सेवा भरती परिक्षेबाबत**

**(१) ४६१३ (२२-१२-२०१४). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हापरिषदेच्या सरळ सेवा भरती परिक्षेच्या प्रश्नपत्रिकांच्या ॲन्सर की (मूळ उत्तरपत्रिका) अद्यापही जाहिर करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची ॲन्सर की प्रसिध्द करावी अशी मागणी उमेदवारांनी वारंवार केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्नपत्रिका व मूळ उत्तरपत्रिका यात तफावत असावी आणि त्यामुळे ती जाहिर केली नसल्याने सदरची भरती प्रक्रिया वादात सापडली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-१२-२०१५) :** (१) होय.
(२) उत्तरतालीका प्रसिध्द करण्याची मागणी अंतिम निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर करण्यात आली होती.
(३) व (४) सन २०१४ च्या अखेरीस घेण्यात आलेल्या जिल्हा परिषद गट “क” व गट “ड” पदांच्या भरती प्रक्रीयेच्या उत्तर तालिका (ॲन्सर की) प्रसिध्द करण्याबाबत शासनाच्या स्पष्ट सूचना नव्हत्या. त्या प्रसिध्द करण्याबाबत आता शासनाच्या दिनांक २१/४/२०१५ च्या परिपत्रकान्वये सर्व जिल्हा परिषदांना सूचना दिलेल्या आहेत.

---

**मध्य वैतरणा धरण बांधताना सदर धरणावर महाविद्युत प्रकल्पात शासनाच्या जलसंपदा विभागाने हस्तक्षेप केल्याबाबत**

**(२) ९८३९ (०७-०४-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मध्यवैतरणा धरण बांधतांना सदर धरणावर जलविद्युत प्रकल्प उभारण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिकेने घेतला असता शासनाच्या जलसंपदा विभागाने यामध्ये हस्तक्षेप करून प्रकल्प उभारणीचे काम महालक्ष्मी कोणाल ऊर्जा प्रा.लि.या कंपनीला सन २००५ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरण मुंबई महानगरपालिकेचे धरणाची जमीन मुंबई महानगरपालिकेची असतांना कायद्यानुसार जलविद्युत प्रकल्प उभारणीचा अधिकार मुंबई महानगरपालिकेलाच असताना शासनाने यांप्रकरणी हस्तक्षेप करण्याची कारणे काय आहेत,

(३) याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (१६-११-२०१५) :** (१) व (२) राज्य शासनाचे कार्य नियमावली नुसार जलविद्युत निर्मिती हा विषय जलसंपदा विभागाचा आहे. जलसंपदा विभागाचा २००५ च्या हायड्रो पॉलिसीनुसार २५ मे वॅट स्थापित क्षमते पर्यंतचे जलविद्युत प्रकल्प खाजगी प्रवर्तकांना विकसनासाठी देण्यात येतात. या धोरणानुसार मे. महालक्ष्मी कोनाल उर्जा प्रा. लि. पुणे यांनी सदर जलविद्युत प्रकल्प विकसनासाठी प्रथम मागणी केल्यामुळे प्रथम मागणी करणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्वावर त्यांना परवानगी (LOP) दिली आहे.

मध्य वैतरणा धरणाची मालकी आणि नियंत्रण बृहन्मुंबई महानगरपालिकेची असून वन विभागाने सदर धरणाची व पायथ्याखालील जागा महानगरपालिकेला हस्तांतर केली आहे. त्यामुळे खाजगीकरणाद्वारे सदर ठिकाणी विजनिर्मिती प्रकल्प न उभारता केवळ महानगरपालिकेच्या माध्यमातून सदर वीज निर्मिती प्रकल्प विकसित करण्याची मागणी बृहन्मुंबई महापालिकेने शासनाकडे करण्यात आली असून त्यास तत्कालीन मा. मुख्यमंत्री यांनी मान्यता दिली आहे. सदरची बाब विद्यमान मा. मुख्यमंत्री यांना पुर्न:विलोकनासाठी सादर करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे जिल्ह्यात पाणी साठ्यात घट होत असल्यामुळे पाण्याच्या साठ्याचे होणारे बाष्पीभवन थांबविण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(३) १६४९४ (१७-०८-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यात ८ मध्यम व ४६ लघु प्रकल्प असून मे महिन्यांच्या मध्यावरच यातील २२ लघू प्रकल्प कोरडे पडले आहेत. जिल्ह्यात तापमानाचा पारा वाढल्याने या पाणी साठ्यात वेगाने घट होत आहे असे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोठ्या पाण्याच्या साठ्याचे होणारे बाष्पीभवन थांबविण्याच्या दृष्टीने शासनाने काही संशोधनात्मक कार्य करण्यास शास्त्रज्ञांना सूचविले आहे काय,

(३) असल्यास, त्याचा तपशील काय,

(४) सदर तपशील उपलब्ध नसल्यास त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-१०-२०१५) :** (१) होय.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उर्ध्व पैनगंगा कालव्यातून बाभळी बांधाऱ्यासह गोदावरी नदी पात्रात पाणी सोडण्याबाबत

**(४) १६९३२ (१४-०८-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धर्माबाद ता.जि.नांदेड येथील बाभळी बंधाऱ्याच्या पात्रात उर्ध्व पैनगंगेच्या कालव्याचे (गोदापात्र) सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार १ जुलै, २०१४ रोजी रिक्त करण्यात आले ते अद्यापपर्यंत भरलेच नाही यामुळे जनावरांच्या पिण्यांच्या पाण्याचा व चाऱ्याचा प्रश्न अतिशय गभीर झाला असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नागरिकांनी उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाच्या कालव्यातून बाभळी बंधाऱ्यासह गोदावरी नदी पात्रात पाणी सोडण्याची मागणी सुरू केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-१०-२०१५) :** (१) दि. ०१ जुलै, २०१४ पासून पाऊस अत्यल्प झालेला असल्यामुळे बंधाऱ्यात पाणी साठा झालेला नव्हता. तसेच यावर्षी दिनांक ०१/०७/२०१५ पासून आजपावेतो बंधारा पाणलोट क्षेत्रात अत्यल्प पर्जन्यमान झालेले असून नदी प्रवाहित झालेली नाही.

(२) स्थानिक पातळीवरुन तशी कुठलीही मागणी प्राप्त नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील घुईखेड येथे बेंबळा प्रकल्पांतर्गत नाल्यावर रपटया टाकण्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(५) १७००८ (१७-०८-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील घुईखेड येथे बेंबळा प्रकल्पांतर्गत नाल्यावर रपटे टाकणे सुर असून त्या रपट्याखाली सिमेंट पाईप टाकून त्यावर रपट्या टाकल्या जात असून हे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून तेथील ठेकेदार व अधिकाऱ्यांच्या मनमानी व संगनमताने बेंबळा प्रकल्पग्रस्तांचे आर्थिक शोषण करीत असल्याची बाब दिनांक २५ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे व चौकशीअंती काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

या कामाबाबत कुठलीही तक्रार प्राप्त झाली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भ्वत नाही.

---

**आंध्रप्रदेश-तेलगंणा व महाराष्ट्र यांच्या संयुक्तरित्या करार केलेल्या आंतरराज्यीय प्रकल्प असलेल्या लेंडी प्रकल्पात मुखेड तालुक्यातील गावे बुडीत क्षेत्रात गेली असल्याबाबत**

**(६) १७१३१ (१४-०८-२०१५). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंध्रप्रदेश-तेलगंणा व महाराष्ट्र यांच्या संयुक्तरित्या करार केलेल्या आंतरराज्यीय प्रकल्प असलेल्या लेंडी प्रकल्पात मुखेड तालुक्यातील ११ गावे पूर्णत: तर एक गाव अंशत: बुडीत क्षेत्रात गेले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पग्रस्तांच्या आजच्या बाजारभावाप्रमाणे शेती, घराचा मोबदला तडजोडीतून एक रकमी अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही. लेंडी धरणाची अद्‌याप घळभरणी झाली नसल्याने, एकही गाव बुडीत झालेले नाही. मात्र घळभरणी झाल्यानंतर ११ गावे पूर्णत: व एक गाव अंशत: बाधित होणार आहे.
(२) प्रकल्पाच्या बुडित क्षेत्रातील शेत जमिनीचा व बुडित क्षेत्रात येणाऱ्या ११ गावठाणातील घरांचा मावेजा वाटप झालेला आहे. उर्वरित एक गावठाणातील (मुक्रामाबाद) घरांचा निवाडा घोषित झाला असून निधी उपलब्धतेनुसार मावेजा वाटप करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे जिल्हयातील पूर्ण हवेली तालुक्यात अनेक ग्रामपंचायत सदस्यांनी घरकुल योजनेत केलेला गैरव्यवहार

**(७) १७६७५ (१४-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील पूर्ण हवेली तालुक्यात अनेक ग्रामपंचायत सदस्यांनी आपल्या नातेवाईकांना तसेच सदर व्यक्तींना घरकुल याजनेचा लाभ दिला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) पुणे जिल्हयातील हवेली तालुक्यातील पूर्व भागामध्ये सन २०१० पासून एप्रिल, २०१५ पर्यंत अनेक बनावट घरकुल लाभार्थ्यांना पंचायत समिती हवेली कडून घरकुल वाटप केल्याची बाब दिनांक २५ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामध्ये अनेक लाभार्थ्यांना घर बांधलेले नसताना सुध्दा अनुदानाचे संपूर्ण वाटप करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, लाभार्थ्यांकडून प्रत्येकी २० हजार रुपये घेवून त्यांना ६८५०० रुपयांचे घरे पूर्ण झाल्याचे धनादेश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, पूर्व हवेली तालुक्यातील या घरकुल वाटप योजनेबाबत संबंधितांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-११-२०१५) :** (१) व (२) होय.
तथापि, पुणे जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या यशवंत घरकुल योजनेअंतर्गत ग्रामपंचायत हिंगणगाव येथे दि.१३.३.२०१५ रोजी तक्रार प्राप्त झालेली आहे.

इंदिरा आवास योजनेअंतर्गत कोणतीही अनियमितता झालेली नसून योजनेसंदर्भात कोणतीही तक्रार नाही.

(३) नाही.

दिनांक १३.३.२०१५ रोजी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असता, ग्रामपंचायत हिंगणगाव येथील १९ पात्र लाभार्थ्यांना जिल्हा परिषद स्वनिधीमधून राबविण्यात येत असलेल्या यशवंत घरकुल योजनेतून लाभ देण्यात आला आहे. त्यामध्ये लाभार्थ्यांना घर बांधलेले नसतांना अनुदानाचे वाटप करण्यात आल्याची बाब चौकशीमध्ये निष्पन्न झालेले नाही.

(४) नाही.

चौकशीमध्ये अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणेकरांसाठी धरणांतील सद्याच्या पाणी पिण्याच्या साठ्याचे नियोजन करण्याबाबत**

**(८) १७६७६ (१४-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे पाणीपुरवठा करणा-या खडकवासला प्रकल्पात ५ एप्रिलला ११.१० टी.एम.सी. पाणीसाठी होता. पावसाळा लांबल्यास पुणेकरांना पाणीकपातीला तोंड द्यावे लागणार आहे. कारण शेतीला मे पर्यंत पाणीपुरवठा होतो. त्यानंतर १५ जुलैपर्यंत पुणेकरांसाठी आरक्षित पाणीच पुरवून वापरावे लागणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील धरणांतील सद्याच्या पाणी पिण्याच्या साठ्याचे नियोजन व्यविस्थत करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-१०-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) खडकवासाला प्रणालीतून पुणे शहर व परिसर, दौंड व इंदापूर नगरपालिका, ग्रामीण पाणी पुरवठा व सिंचनासाठी पाणी दिले जाते. तसेच नवीन मुठा उजवा कालव्यांमधून पिण्याचे पाणी दिले जाते.

पुणे महानगरपालिकेस पाणीवापरामध्ये बचत करण्याची सूचना डिसेंबर, २०१४ व एप्रिल/ मे, २०१५ मध्ये विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांमार्फत देण्यात आली होती. दिनांक ८ जानेवारी, २०१५ च्या बैठकीत नवीन मुठा उजवा कालवा सल्लागार समितीने ९ जानेवारी, २०१५ ते १५ जुलै , २०१५ या कालावधीसाठी ८.९५ टिएमसी पाणी पुणे महानगरपालिकेसाठी आरक्षित करावा व सिंचनासाठी कमी पडणारे १.९९ टिएमसी पाणी पुणे महानगरपालिकेने सांडपाणी प्रक्रिया करुन जुना मुठा उजवा कालव्यामध्ये सिंचनासाठी उपलब्ध करुन द्यावे असे ठरले. खडकवासाला प्रणालीमध्ये दि. १/९/२०१५ रोजी १४.६७ म्हणजेच ५०.३२ % इतका पाणीसाठा उपलब्ध आहे. दि. २२/८/२०१५ रोजी पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बैठकीत जलसंपदा विभागाने सादर केलेल्या सादरीकरणामध्ये खडकवासाला

प्रणालीतील सध्याचा पाणीसाठा १५ जुलै, २०१६ पर्यंत वापरायचे झाल्यास पुणे शहराचा पाणी पुरवठा एक दिवसाआड करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. त्यानुसार पुणे महानगरपालिकेमार्फत कार्यवाही अपेक्षित आहे.

---

**"आयएसओ" हा स्तुत्य उपक्रम राज्यभर राबविण्याबाबत**

**(९) १७६८५ (१७-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमची सेवा, गुणवत्ता व दर्जा हा आंतरराष्ट्रीय असला पाहिजे हा ध्यास घेवुन पुणे जिल्हा परिषदेने "आयएसओ" ही संकल्पना जिल्ह्यात गेल्या वर्षापासून राबविण्यास सुरुवात केली असून या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत असल्याने ७९५ संस्था "आयएसओ" करण्यात यश आले आहे, त्यामध्ये ४३० शाळा या बोलक्या झाल्याचे माहे २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा स्तुत्य उपक्रम राज्यभर राबविल्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-१०-२०१५) :** (१) होय.

हे खरे आहे.

पुणे जिल्ह्यात आतापर्यंत एकूण ३५९ अंगणवाड्या, ५७६ प्राथमिक शाळा व ३१० ग्रामपंचायती अशा एकूण १२४५ संस्था "आयएसओ" झालेल्या आहेत.

(२) सन २००५-०६ पासून विभाग व राज्यस्तर अशा दोन्ही स्तरावर यशवंत पंचायत राज पुरस्कार योजना सुरु करण्यात आली आहे. प्रस्तुत यशवंत पंचायत राज पुरस्कार वितरणाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेसाठी ISO नामांकनाखाली १ गुण ठेवला जातो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील कसबा-बावडा ते वडणगे-निगवे परिसरातील पंचगंगा नदीवरील राजाराम बंधाऱ्यावरून अवजड वाहनाची होत असलेली अवैद्य वाहतूक**

**(१०) १८५०६ (१७-०८-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील कसबा-बावडा ते वडणगे-निगवे परिसरातील पंचगंगा नदीवरील राजाराम बंधाऱ्यावरून अवजड वाहनाना वाहतूकीस बंदी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंदी असूनही काही ट्रकचालक या बंधाऱ्यावरून राजरोसपणे ये-जा करीत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बंधाऱ्याची रुंदी कमी असल्याने अपघात होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बंदी मोडून वाहतूक करणाऱ्या वाहन चालकांवर आतापर्यंत जिल्हा प्रशासनाने कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-१०-२०१५) :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.
(३) होय.
(४) सद्यस्थितीत अशी कार्यवाही झालेली नाही, परंतू क्षेत्रिय स्तरावरुन जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस प्रशासन यांना उचित कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालवण-देवगड (जि.सिंधुदूर्ग) मार्गावरील चिंदर-कुडोपी व चिंदर-नागोचीवाडी या जोडरस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(११) १८९५९ (१७-०९-२०१५). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालवण-देवगड (जि.सिंधुदूर्ग) मार्गावरील चिंदर-कुडोपी व चिंदर-नागोचीवाडी या जोडरस्त्यांची दुरवस्था झाल्याने वाहन चालकांसह विद्यार्थी व ग्रामस्थांचे प्रवासा दरम्यान हाल होत असल्याने चिंदर-नागोचीवाडी युवक मंडळ, मुंबई यांच्यावतीने जिल्हयाचे मा.पालकमंत्री यांच्याकडे माहे एप्रिल, २०१५ मध्ये निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या दहा वर्षापासून सतत जि.प.बांधकाम विभाग, मालवण यांच्याकडे रस्ता दुरुस्त करण्याबाबत मागणी करुनही कोणतीच कार्यवाही केली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रस्ता दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-१२-२०१५) :** (१) होय.
(२) नाही.
(३) व (४) चिंदर कंडोपी रस्ता हा प्रजिमा १८ दर्जाचा असून, त्याची लांबी एकूण १३.५५० कि.मी. एवढी आहे. हा रस्ता डांबरी पृष्ठाभागाचा असून वाहनमार्ग ३.७५ मी. रुंदीचा आहे.

सन २०१३-१४ अर्थसंकल्पात १४/०० ते १५/०० (प्रत्यक्षात कि.मी. ३/०० ते ४/००) व गट "ई" पुरहानी कार्यक्रमामध्ये ०/०० ते ३/०० मधील पृष्ठभागावर डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले असून ४/५०० ते ५/०० मधील पृष्ठभाग अंशत: खराब व कि.मी. ५/६०० ते ५/७०० मधील

पृष्ठभाग खराब झालेला आहे. उर्वरित रस्त्याचा पृष्ठभाग सुस्थितीत आहे. खराब पृष्ठभागाचे काम शासन निकष व निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

चिंदर नागोची गाडी रस्ता हा ग्रामीण मार्ग ३१ दर्जाचा असून लांबी ०.६५० किमी असून डांबरी पृष्ठभाग खराब आहे. विशेष दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम जिल्हापरिषदेमार्फत निधीच्या उपलब्धतेनुसार होती घेऊन पूर्ण करण्याचा प्रयत्न राहील.

---

**शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील येथील नामपाडा धरणाचे प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(१२) १९०२८ (१४-०८-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील सावरोली गावाशेजारील व टाकीपठार देवस्थानच्या पायथ्याशी असणाऱ्या नामपाडा कुतरकुंड लघुपाटबंधारे प्रकल्पाचे काम गेल्या वर्षभरापासून अपूर्णावस्थेत असून ठेकेदार व शासनाच्या उदासीन धोरणामुळे येथील शेतकरी पाण्यापासून वंचित असल्याचे माहे मे,२०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यांची कारणे काय आहेत तसेच धरणाचे काम तातडीने पूर्ण व्हावे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदर काम अपूर्णावस्थेत ठेवून शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-१०-२०१५) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

सदर प्रकल्पास ३८.९९ हे. वनजमीन आवश्यक आहे वन प्रस्तावास अंतिम मान्यता अद्यापी मिळाली नसल्याने योजनेचे काम पूर्ण होऊ शकले नाही.

(३) वन प्रस्तावास केंद्र शासनाचे दि. १३/५/२००८ रोजी तत्वत: मान्यता दिलेली आहे. तत्वत: मान्यतेच्या अटी नुसार वन मोबदला (N.P.V.) व इतर अनुषंगीक कामापोटी रु. ४.८१ कोटी इतकी रक्कम वन विभागास अदा केलेली आहे.

पर्यायी वनक्षेत्र सदर प्रकल्पासाठी ३८.९८ हे. मे, २०१५ मध्ये वन विभागास हस्तांतरीत करण्यात आले आहे. वन विभागाने पर्यायी वनीकरणाच्या फरकाच्या रक्कम रु. ५२.५२ लक्ष सन २०१५-१६ च्या दराने भरणेबाबत कळविले आहे. त्यानुसार सदर रक्कम तात्काळ वन विभागाकडे भरणा करण्यात येईल.

(४) व (५) प्रकल्पास आवश्यक वनजमिनीचे हस्तांतरण अद्यापही न झालेले योजनेचे काम प्रलंबित आहे. त्यामुळे ठेकेदार/अधिकारी यांचेवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

सदर योजनेचे काम वन जमीन प्रस्तावास अंतिम मंजूरी प्राप्त होताच सुरु करण्याचे नियोजन आहे.

---

## निफाड व सिन्नर (जि.नाशिक) ह्या तालुक्यांना पाणी पुरवठा करणारा कडवा धरणाच्या कालव्याचे काम निकृष्ठ दर्जाचे झाल्याबाबत

**(१३) १९१६५ (१४-०८-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड व सिन्नर (जि.नाशिक) ह्या तालुक्यांना पाणी पुरवठा करणारा कडवा कालव्या व्दारे मोठ्या प्रमाणावर ५० % पेक्षा कमी आनेवारी असणा-या गावांना पाणी पुरवठा केला जातो परंतु कडवा धरणाच्या कालव्याचे निकृष्ट कामामुळे लागलेल्या गळतीमुळे ६८० द.ल.घ.फु पाणी वाया जाऊन शेवटचे टोक असलेल्या पुतळे वाडा गांवापर्यंत पाणी पोचण्यास १५ दिवसांचा कालावधी लागल्या प्रकरणी माहे सप्टेंबर, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांनी सचिव जलसंपदा यांना कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय आढळून आले,

(४) असल्यास, निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारावर काय कारवाई केली तसेच कालवा दुरुस्तीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-१०-२०१५) :** (१) नाही.

तथापि, सदर कालवा मुरमाड स्तरावरुन जातो. कालव्यातून लक्षणीय गळती होते ही वस्तुस्थिती आहे. पुतळेवाडी हे गाव कालव्याच्या अंत्य भागात (किमी ८८) मध्ये असून कालव्याच्या पूच्छ भागात पाणी पोहचण्यास १५ दिवसांचा कालावधी लागतो. ही सुध्दा वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) कालव्याच्या पुच्छ भागात आवश्यक विसर्ग मिळणेसाठी कालवा नुतनीकरण करण्याचा समावेश असलेल्या रु. १४२.२१ कोटी किंमतीच्या तृतीय सुप्रमा अंदाजपत्रकास दिनांक ३१.८.२००९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. कालवा नुतनीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) गुणनियंत्रण यंत्रणेकडील अहवालानुसार कामाच्या गुणवत्तेमध्ये तृटी आढळल्या नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालवण तालुक्यातील कांदळगांव व हडी (जि.सिंधुदुर्ग) गावाच्या सीमेवर असलेल्या खार बंधाऱ्याची झडपे बंद न केल्याने ४०० एकर जमीन नापीक झाल्याबाबत

**(१४) १९५०० (१७-०८-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण तालुक्यातील कांदळगांव व हडी (जि.सिंधुदुर्ग) गावाच्या सीमेवर असलेल्या खारबंधा-याची झडपे बंद न केल्याने सुमारे ४०० एकर जमीन नापीक बनली असल्याचे नुकतेच माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमीन नापीक झाल्यामुळे आक्रमक झालेल्या ग्रामस्थांनी खारभूमी विकास संघर्ष समिती स्थापन केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-१०-२०१५) :** (१) नाही.

सा.क्र. २४० मी वरील उघाडीचे २ झडपा व सा.क्र. १६१० मी. वरील उघाडीच्या ३ झडपा भरतीमुळे एप्रिल, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात तुटल्या होत्या. या तुटलेल्या झडपामधून आलेले खाडीच्या भरतीचे पाणी प्रापण क्षेत्रातील नाल्यातच सिमित रहात असल्यामुळे प्रापण क्षेत्रातील जमिन नापिक झालेली नाही.

(२) जमिन नापिक झालेली नाही. तथापि, हडी-कांदळगांव ता.मालवण येथील ग्रामस्थांनी खारभूमी विकास संघर्ष समिती स्थापन केली आहे.

(३) दि. २४/०४/२०१५ रोजी तहसिलदार, मालवण यांनी संघर्ष समिती व खारभूमी विकास यंत्रणेच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन वस्तुस्थिती जाणून घेतली व त्वरीत झडपा बसविणेबाबत संघर्ष समितीस आश्वासित केले.

(४) संघर्ष समितीस आश्वासति केल्याप्रमाणे दि. २९/०४/२०१५ रोजी संघर्ष समिती सदस्यांच्या उपस्थितीत तुटलेल्या झडपांच्या ठिकाणी नवीन झडपा बसविण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुचकुंदी बृहत लघु पाटबंधारे अंतर्गत होणा-या धरणात बाधित झालेल्या लोकांचे पुनर्वसनाबाबत

**(१५) १९६१४ (१७-०८-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लांजा तालुक्यातील (जि.रत्नागिरी) खोरनिनको येथे होत असलेल्या मुचकुंदी बृहत लघु पाटबंधारे अंतर्गत होणा-या धरणाच्या कालव्यासाठी भू-सुरुंगामुळे आजूबाजुचे घरे पडू लागली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुचकुंदी बृहत लघु पाटबंधारे अंतर्गत होणा-या धरणात बाधित झालेल्या लोकांच्या पुर्नवसनाबाबत शासनाने काय निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, उक्त धरणात बाधित झालेल्या लोकांच्या पुनर्वसनासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-१०-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

धरणाच्या पुच्छ कालव्याचे खोदकाम सुरुंगामुळे केल्याने गुरववाडी येथील घरांना हादरे बसून नुकसान होत ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) धरण पाया व बुडित क्षेत्रामध्ये बाधीत झालेल्या सर्व लोकांनी स्वेच्छा पुनर्वसन घेतले असून गुरववाडीतील बाधित लोक सोडून सर्व बांधितांना जमीन व घरांचा मोबदला अदा करण्यात आलेला असून त्यांचे सोयीचे ठिकाणी स्थलांतरीत झालेले आहे. पुच्छ कालच्या लगत असलेल्या गुरववाडीनेही स्वेच्छा पुनर्वसन स्वीकारले असून पुनर्वसनाबाबत भूसंपादन प्रस्ताव क्र. ३८३८ प्रारुप निवाडा स्तरावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल तालुक्यातील केळवणे साई व उरण तालुक्यातील पूनाडे वशेणी या गावांत खाडीचे पाणी भातशेतीत शिरुन भातशेती नापीक झाल्याबाबत**

**(१६) १९७९२ (१७-०८-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील केळवणे साई तसेच उरण तालुक्यातील पूनाडे वशेणी या गावांत खाडी किनाऱ्यावरील बांधबंदिस्त तुटल्यामुळे खाडीचे पाणी भातशेतीत शिरत असल्याने हजारो एकर भातशेती नापिक झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे भातशेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबियांवर उपासमारीची पाळी आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या बाधित कुटुंबियाना शासनाने कोणती तातडीची आर्थिक वा अन्य मदत केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच समुद्राचे पाणी अडविण्याकरिता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२८-१०-२०१५) :** (१) साई ते केळवणे या भागात साई ही शासकिय खारभूमी योजना आहे. या योजनेचे नुकसान झालेले नाही. तसेच पूनाडे वशेणी या योजना खाजगी खारभूमी योजना आहेत.
(२) शासकीय खारभूमी योजनेचे नुकसान झाले नसल्याने प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील केळवणे साई तसेच उरण तालुक्यातील पूनाडे वशेणी या योजनांसह एकुण ७ खारभूमी योजनांची कामे कॉरपोरेट सेक्टर रिसपॉनसिबिलिटीचे माध्यमातून हाती घेणे प्रस्तावित आहे.

---

**उरण (जि.रायगड) तालुक्यातील खाडी किनारीच्या बांधबंधिस्ती दुरुस्तीच्या अभावी समुद्राचे पाणी शेतात शिरुन भातशेती नापिक होत असल्याबाबत**

**(१७) १९७९६ (१४-०८-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) तालुक्यातील चिखली भोम व हरिश्चंद्र पिंपळे (कोठा) व काप्रोली येथील खाडी किनाऱ्यावरील बांधबंधिस्तीच्या कामाकडे खारलँड विभागाने दुर्लक्ष केल्यामुळे या परिसरातील भातशेतीत मागील दोन वर्षापासून समुद्राच्या भरतीचे पाणी शिरुन हजारो हेक्टर जमिन नापिक झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे बांधबंदिस्तीचे दुरुस्तीचे काम अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच यामुळे भातशेतीवर अवलंबून असलेल्या १०० कुटुंबियांवर उपासमारीची पाळी आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या बाधित कुटुंबियांना शासनाने कोणती तातडीची आर्थिक वा अन्य मदत केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच समुद्राचे पाणी अडविण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-१०-२०१५) :**(१) या योजना खाजगी असून सदर योजनांची कामे शासनामार्फत करण्यात येत नाहीत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) उरण तालुक्यातील (जि.रायगड) चिखली भोम व हरिशचंद्र पिंपळे (कोठा) या योजनांसह एकुण ७ खारभूमी योजनांची कामे कॉरपोरेट सोशल रिस्पॉनसिबीलीटीचे माध्यमातून हाती घेण्याबाबत प्रयत्न करण्यात येत आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खारभूमी योजनांना मंजूरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(१८) २०१२६ (१७-०८-२०१५). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण व अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील अनेक गावे खाडी किनारी वसलेली असून खाडी किनारी लगत असलेली भातशेती वडीलोपार्जीत पध्दतीने आजतागायत करत असून गेल्या ६ ते ७ आर्थिक वर्षात योजनांचे प्रस्ताव शासनाकडे सादर केले असून त्यास मान्यता न मिळाल्याने व आवश्यक निधि उपलब्ध न झाल्याने भात पिकांखालील जमिनीच्या बांधीत क्षेत्रात वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त तालुक्यातील खाडीलगत असलेल्या जमिनी सरंक्षीत करणेच्या दृष्टीने शासन प्रस्तावित योजनांना मंजूरी देवून आवश्यक निधी उपलब्ध करणार आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-१०-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

गेल्या ७ वर्षात पेण व अलिबाग तालुक्यातील अनुक्रमे १० व १४ असे एकूण २४ शासनास प्राप्त खारभूमी योजनांच्या अंदाजपत्रकांपैकी पेण तालुक्यातील ८ व आलिबाग तालुक्यातील ६ असे एकूण १४ खारभूमी योजनांच्या अंदाजपत्रकांना मंजूरी देण्यात आली आहे. त्याची एकूण किंमती रु. ३२७३.५६ लक्ष इतकी असून, जुलै-१५ अखेर या कामासाठी रु.२३७७.५४ लक्ष इतका निधी खर्च झाला आहे. मार्च-२०१५ अखरे यापैकी ३ योजनांची कामे पूर्ण झाली असून उर्वरित योजनांची कामे प्रगतिपथावर आहेत. सद्य:स्थितीत बाधीत क्षेत्रात वाढ झालेली नाही.

(२) व (३) खारभूमी योजनांची नुतनीकरणाची कामे नाबार्ड अर्थ सहाय्यामधून करण्यात येत आहेत. तसेच केंद्र शासनाच्या राष्ट्रीय चक्रीवादळ निवारण प्रकल्पांतर्गत ७ योजनांची कामे करण्याचे प्रसतावित आहे. तसेच, खारभूमी योजनेचे आर्थीक मापदंड सुधारित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भामा-आसखेड (ता.खेड, जि.पुणे) धरण प्रकल्पबाधित गावांना नागरी सुविधा व पुनर्वसानाचा लाभ मिळण्याबाबत**

**(१९) २०५३८ (१४-०८-२०१५). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामा-आसखेड (ता.खेड, जि.पुणे) धरण प्रकल्पबाधित गावांना नागरी सुविधा व पुनर्वसन लाभ मिळण्याबाबतचा रितसर प्रस्ताव जलसंपदा विभागाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रश्नासंदर्भात मा.जलसंपदा राज्यमंत्री यांच्या दालनात दिनांक १३ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास बैठक झाली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बैठकीत प्रकल्पबाधित गावांना नागरी सुविधा व पुनर्वसनाचा लाभ मिळण्याबाबत कोणते निर्णय घेण्यात आले व त्यांचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, या निर्णयाची अंमजलबजावणी केव्हापर्यंत करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०९-२०१५) :**(१) होय, भाना आसखेडा प्रकल्प ता.खेड, जि.पुणे रोधंळवाडी व चोरघेवाडी ता.खुड, जि.पुणे या अंशत: बाधीत गावांना खास बाब म्हणून नागरी सुविधा पुरविणे कामाचा प्रस्ताव व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबतच्या प्रस्ताव प्राप्त झाला असून, सदर प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(२) व (३) होय, दि. १३/५/२०१५ च्या बैठकीमध्ये भामा आराखेड प्रकल्पाच्या पुनर्वसन व नागरी सुविधाबाबत खालील निर्णय घेण्यात आले.

१) अद्याप जमीन वाटप न केलेल्या २८ खातेदारांना ६ महिन्याच्या आत पर्यायी जमीन वाटप करणे.

२) शिवे व रौंधळवाडी या दोन गावांच्या घरांचे पेमेंट व नागरी सुविधा खास बाब प्रस्तावाबाबत जलसंपदा विभागाने महसूल विभागास संमती कळवावी व महसूल विभागाने सुधारित किंमतीस मान्यता द्यावी.

३) मौजे कासारी, वाघू, वाघूची साबळेवाडी , तोरणे बुद्रुकाची कुदळेवाडी "खासबाब" पुनर्वसन प्रस्ताव महसूल व पुनर्वसन विभागास आयुक्तामार्फत सादर केला आहे. महसूल व पुनर्वसन विभागाने प्रस्तावावर कार्यवाही करावी.

४) मौजे पाईट, गवारवारी, पापळवाडी प्रकल्पग्रस्तांनी स्वत:च्या शेतात बांधलेल्या वस्त्यावर नागरी सुविधा देणेबाबत नियामक मंडळात ठराव घेऊन मंजुरी देऊन शासनास अहवाल सादर करणे.

५) प्रकल्प अहवालातील घटकनिहास तरतूदीपेक्षा खर्च जास्त झाला असला तरी पाळू कासारी रस्त्यास डांबरीकरण करणे कामास "विशेष बाब" म्हणून महामंडळाने सांकेतांक क्रमांक द्यावा.

६) पराळे पुनर्वसित गावठाणाच्या पाणी पुरवठा विहिरीचे भूजल सर्वेक्षण यंत्रणेसमवेत पाहणी करुन आवश्यक उपाययोजना करुन पाणी उपलब्ध करुन द्यावे.

(४) सदरहू प्रस्तावावर महसूल पुनर्वसन विभागांतर्गत विविध स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील पाली-भुतिवली धरणाच्या कालव्याची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२०) २१००१ (१७-०८-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील पाली-भुतिवली धरणाच्या कालव्याची कामे माहे जानेवारी, २०१५ अखेर पूर्ण न झाल्याने शेतीला पाणी पुरवठा होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर धरणाच्या कालव्याची कामे पूर्ण करुन शेतीला पुरेसा पाणी पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-१०-२०१५)** :(१) होय.

(२) व (३) या प्रकल्पाचा उजवा कालवा ८ किमी व डावा कालवा ७ किमी असून कालव्याच्या भूसंपादन प्रक्रियेस स्थानिक शेतकऱ्यांचा विरोध आहे. त्याचप्रमाणे मूळ भूसंपादन प्रस्ताव व्यपगत झाल्यामुळे नवीन भूसंपादन कायद्यानुसार भूसंपादन कार्यवाही पूर्ण करुन कालव्याची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मानेगाव (बा) (जि.भंडारा) तिड्डी हे गाव नदीकाठावर असल्यामुळे नदीच्या पाण्याचा या गावाला धोका निर्माण झाल्याबाबत**

**(२१) २१२७० (१४-०८-२०१५). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानेगाव (बा) (जि.भंडारा) तिड्डी हे गाव नदीकाठावर असल्यामुळे नदीच्या पाण्याचा तिड्डी गावाला धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नव्याने तयार झालेल्या गोसीखुर्द धरणाच्या प्रकल्पामुळे नदीचे पाणी अडविण्यात आल्याने नदीचे पाणी वाहत नसल्यामुळे नदीच्या पात्रात वाढ झाली आहे त्यामुळे नदीकाठावरील जमिन दलदल युक्त झाली असून नदीचे काठ दिवसेंदिवस खचत आहे, हे खरे आहे काय,

(३) त्याचप्रमाणे मागील २० वर्षापासून तिड्डी गाव पुनर्वसनाच्या लाभापासून वंचित आहे, वारंवार याबाबत अधिकाऱ्यांना निवेदन देऊनही याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनाची अद्यापपर्यंत पूर्तता करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी कोणता निर्णय घेणार आहे वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-१०-२०१५)** :(१) नाही.

(२) नाही.

गोसीखुर्द धरणाची पुर्ण संचय पातळी २४५.०० मीटर आहे. सद्यस्थितीत पाणी पातळी २४०.६ मीटर आहे. तिड्डी गावातील जमिनीची पातळी २५४.५ मीटर ते २४६.५ मीटर दरम्यान आहे.

(३) नाही.

महाराष्ट्र पूनर्वसन अधिनियम १९८६ अन्वये गावठाणातील ७५ टक्के घरे अथवा ७५ टक्के शेतजमीन प्रकल्पामुळे बाधित होत असल्यास गावाचे पुनर्वसन प्रकल्प खर्चाने करण्यात येते. गावातील ४ टक्के घरे व ४१ टक्के शेतजमीन बाधित झाली आहे. यापैकी एकही निकष पूर्ण होत नसल्याने या गावाचे पुनर्वसन अनुज्ञेय नाही. मात्र बाधित घरांचा व शेतजतीनीचा मोबदला अदा करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उदभवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गोसेखुर्द प्रकल्पाअंतर्गत बाधित गावांवर रोजगार बुडल्यामुळे उपासमारीची वेळ आल्याबाबत**

**(२२) २१२८३ (१४-०८-२०१५). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोसेखुर्द प्रकल्पाअंतर्गत जवळपास २०० गावे बाधित झालीत, हे खरे आहे काय,

(२) उपजिविकेचे साधन असलेला पिढीतील रोजगार बुडला असून त्यांचेवर उपासमारीची वेळ आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यांच्या उपजिविकेसाठी रोजगार उपलब्ध व्हावा या दृष्टीने शासनाने आजवर रोजगार भिमुख धोरण आखले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन असे रोजगार भिमुख धोरण आखणार आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-११-२०१५) :**(१) नाही. गोसीखुर्द प्रकल्पामुळे १८४ गांवे बाधित होत आहेत.

(२), (३), (४) व (५) हे खरे नाही.

गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांना शासनाने रु. १५२ कोटी व रु. ११९९.६० कोटी इतक्या रक्कमेचे विशेष आर्थिक पॅकेज मंजूर केलेले आहे. यामध्ये पर्यायी रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून आर्थिक अनुदान व नोकरी ऐवजी एकमुस्त रक्कम देण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोंढाणे (ता.कर्जत, जि.रायगड) धरण प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेतील**
**दोष दूर करुन प्रकल्प पूर्ण करण्याबाबत**

**(२३) २१३२६ (१४-०८-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंढाणे (ता.कर्जत, जि.रायगड) धरण प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेतील निर्माण दोष दूर करुन प्रकल्पाचे पूर्नविलोकन करुन पूर्वीच्या अंदाज पत्रानुसार प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मार्च २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मा.जलसंपदा मंत्री, यांच्याकडे निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेत दोष निर्माण करणाऱ्या अधिकाऱ्यामुळे प्रकल्प पूर्ण होवू शकला नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कामोठे, खारघरच्या वाढत्या पाण्याची मागणी लक्षात घेता सिडको प्रशासनानेदेखील प्रकल्प लवकर पूर्ण करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी  चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-१०-२०१५) :**(१) होय.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) व (४) सिडकोद्वारे कोंडाणे धरणातून पाण्याची मागणी करण्यात आली असून सिडकोसोबत चर्चा चालू आहे.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गोसेखुर्द प्रकल्प उजव्या मुख्य कालव्यावरील शिवनाला उपसा सिंचन योजना अपुर्ण असल्याबाबत**

**(२४) २१४०६ (१४-०८-२०१५). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागभिड तालुक्यातील (जिल्हा चंद्रपूर) गोसेखुर्द प्रकल्प उजव्या मुख्य कालव्याच्या सिंचनापासुन वंचित राहीलेल्या सुमारे ४२ गावांसाठी गोसेखुर्द उजवा कालवा साखळी क्र.२२७०० वरुन शिवनाला उपसा सिंचन योजना राज्य शासनाकडे सुधारित प्रशासकीय मान्यतेकरीता प्रस्तावित केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधीद्वारा दिनाक ९ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास सदर मान्यतेकरीता पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सुधारित मान्यतेच्या जनतेच्या मागणीवर दिनांक १४ मार्च, २०१५ रोजी पुनश्च स्थानिक लोकप्रतिनिधींद्वारा पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर गोसेखुर्द प्रकल्पाच्या सिंचनापासून वंचित राहीलेल्या सुमारे ४२ गावांसाठी अत्यावश्यक असलेल्या शिवनाला उपसा सिंचन योजना पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-१०-२०१५) :**(१) नाही. सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनाकडे नसून राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचेकडे तपासणीधीन आहे.
(२) होय.

(३) नाही.

(४) गोसीखुर्द प्रकल्पाचे मंजूर मुळ, प्रथम अथवा व्दितीय सुप्रमा प्रस्तावात सदर शिवनाला उपसा सिंचन योजनेचा अंतर्भाव नाही तथापि लोकप्रतीनिधीच्या मागणीचा विचार करुन महामंडळ स्तरावर तृतीय सुप्रमा प्रस्तावात या योजनेचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. तृतीय सुप्रमा प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचे स्तरावर तपासणीधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील प्रलंबित असलेले निम्न पेढी प्रकल्प**

**(२५) २१४६१ (१७-०८-२०१५). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील निम्न पेढी प्रकल्प मुळ प्रशासकीय किंमत रु.१६९.१७ कोटी होती. सन २०१४-१५ ला प्रकल्पाची अधावत किंमत रु.९५०.०० कोटी झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रु.१६९.१७ कोटी वरुन प्रस्ताव रु.९५०.०० कोटी वर गेलेला आहे. यामध्ये संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असुन त्यांच्यामुळे शासनास भुर्दंड पडत असून प्रकल्पांच्या कामाला विलंब होत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(४) असल्यास, कार्यकारी अभियंता, निम्न पेढी प्रकल्प यांच्यावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-१०-२०१५) :**(१) होय.

(२) व (३) प्रकल्पाच्या विविध स्तरावरुन नियमित आढावा घेतला जातो. अधिकाऱ्यांचे दुर्लक्षामुळे कामास विलंब व शासनास भुर्दंड पडतो हे खरे नाही.

प्रकल्पग्रस्तांचा भूसंपादकास व पुनर्वसनास विरोध आहे. त्यामुळे प्रकल्पाचा बांधकाम कालावधी लांबून प्रकल्प किंमतीत वाढ झाली आहे. तसेच जमिनीचे दर वाढ, लाभक्षेत्र विस्तार सविस्तर संकल्प चित्रानुसार परिमाणात झालेली वाढ ही किंमत वाढीची अन्य कारणे आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यावल (जि.जळगांव) तालुक्यातील मोर धरणाच्या पाटचाऱ्यांचे**
**काम बंद व अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(२६) २१५३३ (१४-०८-२०१५). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यावल (जि.जळगांव) तालुक्यातील मोर धरणाच्या पाटचाऱ्यांचे काम बंद पडल्याचे व अपूर्ण स्थितीत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले ,

(३) असल्यास, त्यानुसार सदर पाटचाऱ्यांचे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-१०-२०१५) :**(१) व (२) मोर धरणाच्या न्हावी मारुळ व सांगवी बोरखेडा मायनर वरील शेतकऱ्यांचा पारंपारिका कालव्यास विरोध आहे. नलिकाद्वारे वितरणाची मागणी आहे.

(३) व (४) (सदर बदलास सक्षम स्तरावरुन मान्यतेची गरज होती. नियामक मंडळाचे स्तरावरुन सदर मान्यता घेण्यात आली आहे.)

अ) न्हावी व मारुळ वितरीकांचे कामासाठी निविदा कार्यवाही प्रगतीत आहे.

ब) सांगवी बोरखेडा वितरीकेच्या अंदाजपत्रकास तांत्रीक मान्यता देणेची कार्यवाही प्रगतीत आहे.

क) हिंगोणा मायनरची उपवितरीका क्र. १ व २ करीता खाजगी वाटाघाटीचे भुसंपादन करुन वितरीकेची कामे सुरु करणेचे दृष्टीने प्रयत्न सुरु आहेत.

---

**मौजे खार आंबोली (ता.मुरुड, जि.रायगड) येथील धरणाचे काम पूर्ण झाले**
**असून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना मोबदला मिळण्याबाबत**

**(२७) २१७९३ (१७-०८-२०१५). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खार आंबोली (ता.मुरुड, जि.रायगड) येथील धरणाचे काम पूर्ण झाले असून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने अद्यापही मोबदला दिला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना शासन मोबदला देणार आहे काय,

(३) खारआंबोली धरणाचे काम पूर्ण होवून कालवे न काढल्यामुळे सिंचनाखाली येणाऱ्या शेतील पाणी पुरवठा होत नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-१०-२०१५)** :(१) हे खरे नाही.
धरणासाठी संपादित केलेल्या जमीनीचा पूर्ण मोबदला प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना वाटप केला आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) अंशत: खरे आहे.
डाव्या व उजव्या कालव्यावरील पहिल्या किमी. मधील कालव्याचे काम झाले असून त्याद्वारे ६२.३८ हे सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे. त्याद्वारे सन २०१४-१५ मध्ये ३५ हे. प्रत्यक्ष सिंचन झाले आहे. कालव्याची पुढील कामे भूसंपादनाअभावी सुरु होऊ शकली नाहीत.
(४) उर्वरित कालव्यासाठी भू-संपादन प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. भूसंपादन पूर्ण करुन निधीच्या उपलब्धतेनुसार कालव्याची उर्वरित कामे जून २०१७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत कळंब तालुक्यातील प्रस्तावांची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(२८) २२४०१ (१४-०८-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत कळंब तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) वैयक्तिक लाभाच्या विहिरी, शेततळे, गोठे, विहीर पुनरभरण इत्यादी प्रस्तावांची अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा प्रकारची अद्यापपर्यंत एकूण किती प्रकरणे कार्यालयास प्राप्त झाली आहेत,
(३) असल्यास, त्यापैकी किती प्रकरणांना मंजुरी देण्यात आली,
(४) नसल्यास, मंजुरी न देण्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२४-१२-२०१५)** :(१), (२) व (३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कळंब तालुक्यात विहीरी, शेततळे, गोठे , विहीर पुनर्भरण इत्यादी कामांचे एकूण ५७४९ प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी आतापर्यंत ४६४१ इतक्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आलेली असून ४१९० इतकी कामे सुरु झालेली आहेत. त्यापैकी २९५९ कामे पूर्ण झालेली असून १२३१ कामे अपूर्ण आहेत.
(४) अपूर्ण कामे जशी जशी पूर्ण होतील त्याप्रमाणे व ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार प्रस्तावांना मजुरी देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**प्रकाशा - बुराई उपसा जलसिंचन योजनेबाबत**

**(२९) २२७९९ (१४-०८-२०१५). श्री.जयकुमार रावल (सिंदखेडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रकाशा - बुराई उपसा जलसिंचन योजना (ता.जि.नंदुबार) या योजनेच्या कामाला सन १९९९ मध्ये मंजुरी मिळाल्यानंतर या योजनेचे काम गेल्या २ वर्षापासून सुरु करण्यात आलेले असून या योजनेमुळे नंदुरबार, साक्री आणि सिंदेखेडा या तिन्ही तालूक्यातील हजारो हेक्टर जमिनीला लाभ होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेच्या कामाला वेगाने सुरुवात झाली असतांना सद्यास्थितीत हे काम निधी अभावी बंद आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेसाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-१०-२०१५) :**(१) होय. या योजनेद्वारे धुळे जिल्हयातील साक्री तालुक्यातील १९४८ हेक्टर, सिंदखेडा तालुक्यातील १७०८ हेक्टर व नंदुरबार जिल्हयातील ३४२९ हेक्टर असे एकूण ७०८५ हेक्टर क्षेत्र सिचनाखाली येणार आहे.

(२) नाही.

(३) सदर योजनेसाठी अर्थसंकल्पात सन २०१५-१६ या वर्षात रु.१.८८ कोटी ची तरतूद करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे आखाडे-फोफादे (ता.साक्री, जि.धुळे) येथील बुराई मध्यम या प्रकल्पाचा उजवा कालवा कार्यान्वित करण्याबाबत**

**(३०) २२८०१ (१४-०८-२०१५). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आखाडे-फोफादे (ता.साक्री, जि.धुळे) येथील बुराई मध्यम प्रकल्पाला पूर्ण होऊन अनेक वर्षाचा कालावधी लोटल्यानंतर देखील या प्रकल्पाचा उजवा कालवा अद्यापपर्यंत कार्यान्वित करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उजव्या कालव्यामुळे साक्री तालुक्यातील छावडी, घाणेगांव, फोफरे, आमोदे, आगरपाडा अशा विविध गावांतील हजारो हेक्टर जमिन सिंचनाखाली येणार आहे त्यामुळे उजवा कालवा तयार कण्यात यावा अशी मागणी संबंधित गावाच्या शेतक-यांसह लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी सिंचन विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त उजवा कालवा तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१७-११-२०१५) :**(१) मंजूर प्रकल्प अहवालात बुराई प्रकल्पास धरणापासून थेट उजवा कालव्याचे नियोजन नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## माजलगांव उजवा कालव्याच्या कामाबाबत

**(३१) २२८३६ (१४-०८-२०१५). श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजलगांव उजवा कालव्याचे काम पुर्ण झालेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोनपेठ तालुक्याला कधी पाणी मिळणार,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणते धोरण ठरविलेले आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-१२-२०१५) :**(१) माजलगाव उजवा कालव्याच्या एकूण १४८ कि.मी. लांबी पैकी १०१ कि.मी. पर्यंतचे काम पूर्ण झाले आहे, उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.

(२) सोनपेठ तालुक्यातील लाभक्षेत्रास २००८-०९ पासून सिंचनासाठी पाण्याचे उपलब्धतेनुसार पाणी देण्यात येत आहे.

(३) धरणातील उपलब्ध पाणी साठ्यातून लाभधारकांना पाणी पुरवठा करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गोसीखुर्द इंदिरा सागर धरणाच्या डाव्या कालव्याच्या बांधकामाबाबत

**(३२) २३३४८ (१४-०८-२०१५). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आजगाव (चौ.) (जि.भंडारा) येथे सन १९८३ मध्ये प्रशासकीय मंजूरी मिळालेल्या विदर्भातील सर्वात मोठा धरण म्हणून गाजावाजा होत असलेल्या गोसीखुर्द इंदिरा सागर धरणाच्या डाव्या कालव्याच्या बांधकामाची कामे संथगतीने होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधकामाचे काम संथगतीने सुरु असून त्याची चौकशी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे व सदर काम कधीपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-१०-२०१५)** :(१) नाही. गोसीखुर्द डावा कालव्यांतर्गत ची अस्तरीकरणाच्या पुनर्बांधणीची कामे तांत्रीक अडचणीस्तव संथगतीने सुरु आहेत. वितरण व्यवस्थेची कामे निधीच्या उपलब्धतेनुसार सुरु आहेत.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बाभुळगांव (जि.यवतमाळ) बेंबळा प्रकल्पामुळे बाधीत झालेल्या गावांना जिल्हा परिषदेस हस्तांतरीत करण्याबाबत**

**(३३) २३४७१ (१७-०८-२०१५). प्रा.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाभुळगांव (जि.यवतमाळ) बेंबळा प्रकल्पामुळे बाधीत गावांना नविन २० ठिकाणी पुर्नरवसित केलेल्या गावठाणात २०१४ पासून नागरी सुविधेची कामे करण्यात आली असून सद्यस्थितीत गावठाणाच्या जिल्हा परिषद हस्तांतरणा अभावी सर्व कामे दुरुस्तीस आली असल्याचे दिनांक १० मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नागरी सुविधेची दुरुस्ती करण्याकरीता निधी उपलब्ध करून देणार आहेत काय,

(३) नसल्यास, ही संपूर्ण २० गावे पुढील देखभाल व दुरुस्तीस जिल्हा परिषदेस हस्तांतरीत करणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-१०-२०१५)** :(१) बेंबळा प्रकल्पामुळे यवतमाळ जिल्ह्यातील १६ बाधीत गावांचे पुनर्वसन नविन २० ठिकाणी करण्यात आले. पुनर्वसीत गावठाणांत नागरी सुविधेची कामे सन २००७ पुर्वी करण्यात आली. २० गावांपैकी १७ गावांचे हस्तांतरण जिल्हापरिषदेअंतर्गत स्वायत्त संस्थांना करण्यात आले. उर्वरित ३ गावांचे हस्तांतरण झालेले नाही. त्यातील काही नागरी सुविधा दुरुस्तीस आलेल्या आहेत.

(२) पुर्वी पूर्ण झालेल्या नागरी सुविधांच्या दुरुस्ती कामांना प्रशासकीय मान्यता देण्याची तरतुद नसल्यामुळे दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली नाहीत. तथापी याबाबतचा धोरणात्मक निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) व (४) होय.

पुनर्वसित २० गावठाणांपैकी १७ गावांचे हस्तांतरण जिल्हा परिषदेस करण्यात आलेले आहे. उर्वरित बारड, कोपटा १ व पहुर १ या ३ गावठाण्यांमध्ये किरकोळ नागरी सुविधेची कामे पूर्ण झाल्यानंतर डिसेंबर, २०१५ अखरे जिल्हा परिषदेस हस्तांतरण करण्याचे नियोजन आहे.

---

**पहूर (ता.बाभूळगांव, जि.यवतमाळ) येथील शेतकऱ्यांना बेबंळा प्रकल्पात बुडीत क्षेत्रात गेलेल्या त्यांच्या भुखंडाना योग्य मोबदला देण्याबाबत**

**(३४) २३४७८ (१७-०८-२०१५). प्रा.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेबंळा प्रकल्प (ता.बाभूळगांव, जि.यवतमाळ) येथील पहून येथील शेतकरी बुडीत क्षेत्रात गेलेल्या भुखंडाचे दर ७५० चौ.मी मागणीकरीता यवतमाळ येथे आमरन उपोषणास बसले त्यांच्या उपोषण सोडविणाऱ्या अधिक्षक अभियंत्यानी १ महिन्याच्या आत सदर मागणी शासन तर्फे मान्य होईल असे आश्वासन दिले असल्याचे दिनांक २१ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात शासनाची मान्यता प्रदान करण्यात येईल काय,

(३) असल्यास, या प्रकरणी प्रकल्पग्रस्ताची मागणी कधी पर्यत मान्य होईल,

(४) तसेच अशी प्रकरणे उद्भवणार नाहीत यासाठी उपाययोजना करण्यात येतील काय,

(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-१०-२०१५) :**(१) अंशतः, खरे आहे,

मा.वित व नियोजन मंत्री महाराष्ट्र राज्य यांनी यवतमाळ दौऱ्याच्या वेळी उपोषण स्थळी दि. १९/०४/२०१५ रोजी अधीक्षक, अभियंता,यवतमाळ पाटबंधारे मंडळ, यवतमाळ यांचे समवेत भेट दिली असता, आपल्या मागण्याबाबत एक महिन्यात कार्यवाही करण्यात येईल असे तोंडी आश्वासन दिले होते.

(२) शासन महसूल व वन विभागाच्या दि. १३/१०/२०११ च्या शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी दि. २४ ऑगस्ट, २०१५ रोजी आवश्यक प्रस्ताव विभागीय आयुक्त अमरावती यांना पाठविला आहे.

(३) शासन निर्णय महसुल व वन विभाग दि. १३ ऑक्टोबर, २०११ अन्वये लोकन्यायालयात तडजोडीकरीता तिप्पटीपेक्षा जास्त दराचे अधिकार शासनाचे उच्चाधिकार समितीस असल्याने उच्चाधिकार समितीचा निर्णय होताच पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) शासन निर्णय १३.१०.२०११ नुसार तडजोडीबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील बिरवाडी उपसा जलसिंचन योजनेच्या ठेकेदाराने केलेला गैरव्यवहार**

**(३५) २३५८० (१७-०८-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील बिरवाडी उपसा जलसिंचन योजनेचे ठेकेदाराने काम पूर्ण न करता संबंधित अधिका-यांच्या संगनमताने गैरव्यवहार केल्याचे माहे एप्रिल-मे, २०१४ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेकरीता ज्या शेतक-यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या त्या प्रकल्पग्रस्त शेतक-यांना अद्‌याप जमिनीचा मोबदला देण्यात आलेला नाही तसेच उक्त जलसिंचन योजनेचा सन २००४-२००५ मध्ये सुरु होऊनही अद्‌यापही पाणी टंचाई दूर न झाल्यामुळे शहापूर तालुक्यात पाण्याची समस्या निर्माण झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर उपसा जलसिंचन योजनेचे काम पूर्ण न करता गैरव्यवहार केलेल्या ठेकेदारांवर व अधिका-यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-१०-२०१५)** :(१) हे खरे नाही.
(२) सदर प्रकल्पांतर्गतच्या १ वितरण कुंडासाठी संबंधीत भूधारकांने स्वखुशीने दानपत्राद्‌वारे जागा दिली आहे. पाईप वितरण प्रणाली भूअंतर्गत असल्याने भूसंपादनाचा प्रश्न उद्‌भवत नाही. वितरण कुंड क्र. २ साठी जागा स्वखुशीने अद्‌याप शेतकऱ्यांनी दिलेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) सदरची योजना निधी उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**वरखेडे (ता.चाळीसगांव,जि.जळगांव) येथे गिरणा नदीवर उभारण्यात येत असलेले मळगांव पाटबंधारे काम पूर्णपणे बंद असल्याबाबत**

**(३६) २४३७५ (१७-०८-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरखेडे (ता.चाळीसगांव,जि.जळगांव) येथे गिरणा नदीवर उभारण्यात येत असलेल्या प्रकल्पाचा “कमांड एरिया” मळगाव पाटचारीवर अवलंबून असलेल्या गावांपर्यंत असल्याने शासनाने मळगांव पाटबंधारे काम पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर प्रकल्प केव्हापर्यंत पूर्ण होऊ शकतो तसेच तद् नुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-१०-२०१५)** :(१) होय.
(२) सदर मळगांव चारी अतंर्गत येणारे नियोजित लाभक्षेत्र गिरणा नदीवरील बांधकामाधीन वरखेडे लोंढे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात येत असून खर्चात बचत होण्याच्या दृष्टीकोनातून मळगाव चारीचे काम रद्द करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.
(३) व (४) सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात वरखेडे-लोंढे या प्रकल्पास रु. १०.०० कोटीची तरतूद मंजूर आहे. प्रकल्पावर माहे ऑगस्ट २०१५ अखेर रु. ३९.८६ कोटीचा खर्च झाला आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार प्रकल्पाचे काम सन २०१९-२० अखरे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील ८० पांदण रस्त्याचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(३७) २४५८४ (१७-०८-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील महात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत ८० पांदण रस्त्याकरीता १८ कोटी ६० लक्ष रुपये मंजुर असतांनाही सदर पांदण रस्त्याचे काम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामे महसूल व जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या दुर्लक्षतेमुळे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विभागाच्या दुर्लक्षपणामुळे स्थानिक मजुरांना रोजगार उपलबध होऊ शकला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तालुक्यातील टाकळी ते राहूर पांदन २१ लक्ष २१ हजार, अमडापुर ते भवानी पांदन २१ लक्ष ३२ हजार इत्यादी ८० गावांसाठी हा निधी मंजुर असून प्रशासकीय अधिकाराच्या दुर्लक्षामुळे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-१०-२०१५) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.

तथापि एकूण ८० पदांण रस्त्यांकरीता रुपये १४ कोटी १६ लक्ष मंजुर करण्यात आले आहे. त्यापैकी ३९ पांदन रस्त्यांची कामे पूर्ण कण्यात आली असून त्यावर कुशलव अकुशल मिळून रु.७,९१,१७,८२५ एवढा खर्च झालेला आहे. सन २०१५-१६ या वर्षात एप्रिल, २०१५ ते जुलै, २०१५ या कालावधीत मजुरांच्या मागणीनुसार कामे सुरु होती. तथापि जून ते सप्टेंबर या कालावधीत मजुरांकडून कामाची मागणी न आल्याने उर्वरित कामे सुरु करता आलेली नाही.

(४) टाकळी ते राहूर पांदण व अमडापूर ते भवानी या पांदण रस्त्याचे काम सुरु करण्यात आले होते. परंतु सन २०१५-१६ मध्ये वरिल कालावधीत मजुरांची कोणतीही कामाची मागणी प्राप्त न झाल्यामुळे रस्त्याचे काम बंद आहे. मजुरांकडुन कामाची मागणी प्राप्त होताच उर्वरित कामे सुरु करण्यात येतील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा जिल्ह्यातील कृष्णा खोरे या दुष्काळी भागातील जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेला प्रशासकीय मान्यता देण्याबाबत**

**(३८) २४७८० (१७-०८-२०१५). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील कृष्णा खोरे या दुष्काळी भागातील जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेच्या कामाची प्रगती व सद्य:स्थिती काय आहे,

(२) या योजनेच्या कामासाठी शासनाने सन २०१४-२०१५ मध्ये १०४ कोटी रु.मंजूर केले असून या कामाला सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात न आल्यामुळे १०४ कोटी रु.अखर्चित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पाला अद्यापही सुधारित प्रशासकीय मान्यता न देण्याची कारणे काय आहेत,

(४) हा दुष्काळी भाग असल्यामुळे या उपसा जलसिंचन योजनेला त्वरीत प्रशासकीय मान्यता देऊन मिळालेला निधी खर्च करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५) :**(१) कृष्णा नदीवरील बॅरेज, पंपगृहाचे काम व उर्ध्वगामी नलिका प्रगतीपथावर आहे. यांत्रिकी उपकरणे (पंप्स) प्राप्त आहेत. विद्युत पारेषण वाहीनी काम प्रगतीपथावर आहे.

(२) अंशत: खरे आहे. जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेस सन २०१४-१५ करिता रु.१०४ कोटी तरतूद मंजूर होती. त्यापैकी सन २०१४-१५ अखेर रु.६२.४० कोटी इतका निधी प्रत्यक्षात वितरित झालेला असून प्रस्तुत निधीपैकी सन २०१४-१५ मध्ये रु.०.१४ कोटी खर्च झालेला आहे. दिनांक २८/०५/२०१५ च्या पत्रान्वये जिहे कठापूर उपसा सिंचन योजने अंतर्गत बॅरेज व पंपगृह क्र.१ ची कामे सुरक्षित पातळीपर्यंत आणणेसाठी सन २०१४-१५ अखेर शिल्लक रक्कमेपैकी सन २०१५-१६ मध्ये रु.२०.० कोटी खर्च करण्यास "खास बाब" म्हणून मान्यता देण्यात आली असून त्या निधीपैकी रु. १२.९४ कोटी एवढा प्रत्यक्ष खर्च सन २०१५-१६ मध्ये झालेला आहे.

सन २०१४-१५ मधील वितरित तरतुदीपैकी ऑगस्ट २०१५ अखेर रु.४९.३२ कोटी निधी शिल्लक आहे.

(३), (४) व (५) या प्रकल्पाची मूळ प्रशासकीय मान्यताप्राप्त किंमत रु.२६९.०७ कोटी इतकी असून योजनेवर जुलै २०१५ अखेर रु.३१२.५२ कोटी इतका खर्च झाला आहे. प्रकल्पाचा रु.९८०.०७ कोटी किंमतीचा सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.

---

**मराठवाडयाच्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी उपलब्ध पाणीसाठयाचे नियोजन करण्याबाबत**

**(३९) २५१६९ (१७-०८-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेल्या अनेक वर्षापासून मराठवाडयाला पाणीटंचाईच्या झळा बसत आहेत. पण या तीन वर्षात पाण्याची तीव्रतेने टंचाई भासत आहे. मराठवाडयातील ८०६ मोठया, मध्यम आणि लहान धरणात नऊ टक्केच पाणीसाठा शिल्लक असल्याचे माहे मे, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यंदाची तीव्र पाणी टंचाई लक्षात घेता उपलब्ध पाणीसाठयाचे नियोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-१०-२०१५)** :(१) होय.

मराठवाडयातील मोठया , मध्यम व लपा (राज्यस्तर) प्रकल्पांचा सन २०१२, २०१३ व २०१४ चा १५ ऑक्टोबर एकूण उपयुक्त पाणीसाठा एकूण संकल्पीत पाणीसाठयाच्या तुलनेत अनुक्रमे २१ % ६०% व ४१ % एवढा आहे.

दिनांक ०८/०५/२०१५ रोजीच्या पाणीसाठा अहवालाप्रमाणे मराठवाडयामधील मोठया, मध्यम व लपा (राज्यस्तरिय) प्रकल्पांतील जलाशयांमध्ये एकूण संकल्पीत पाणीसाठयाचा ९% एवढा उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे.
(२) मराठवाडयातील उपलब्ध पाणीसाठयामधून पिण्यासाठी लागणारे पाणी प्रथम प्राधान्याने राखून ठेवण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील जांबरे मध्यम प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(४०) २५५५१ (१७-०८-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील जांबरे मध्यम प्रकल्पाचे काम पूर्ण न झाल्याने सदर प्रकल्पात पुरेश्या प्रमाणात पाणीसाठा होत नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर प्रकल्पात पुरेसा पाणीपुरवठा व्हावा याबाबत सदर प्रकल्पाचे अपूर्ण काम तातडीने करण्याची मागणी मा.जलसंपदा मंत्री, यांचेकडे चंदगडचे लोकप्रतिनिधींनी यांनी दिनांक १५ जून, २०१५ रोजी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर प्रकल्पाचे अपूर्ण काम पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-१०-२०१५)** :(१) होय.
(२) होय.
(३) सद्यस्थितीत या प्रकल्पामध्ये १६.९८ दलघमी पाणीसाठा करण्यात येत असून, ४१३९ हे (पिकक्षेत्र) सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.
उर्वरित ६.२५ दलघमी पाणीसाठा करण्यासाठी सांडव्याचे उर्वरित काम व अनुषंगिक कामे प्रगतीपथावर आहे.

(४) निधीच्या उपलब्धतेनुसार प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाशिम जिल्ह्यातील वाघी खुर्द लघु पाटबंधारे योजनेच्या कॅनॉलमुळे शेतकऱ्यांच्या जमीनी नापीक झाल्याबाबत

**(४१) २५७०६ (१७-०८-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील श्री.वामन सु. भालेराव या शेतकऱ्यांची गट नं.९१ मधील १४ आर जमीन वाघी खुर्द ल.पा. योजनेच्या (तालुका रिसोड) कॅनॉलमध्ये गेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ल.पा. योजनेच्या कॅनॉलमुळे १९९१-९२ पासून शेतकऱ्यांची गट नंबर ९१ मधील ७० आर व गट नं. ९२ मधील ४० आर. जमीन खराब होवून त्यात खरीपाची पिके उध्वस्त झाली असून या संदर्भात संबंधीत शेतकऱ्याने दिनांक २३ नोव्हेंबर, २०११ पासून ते आजपर्यंत नुकसानीची भरपाई न मिळाल्यास उपोषणास बसण्याचे लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-१०-२०१५) :**(१) होय.
श्री. वामन सु. भालेराव या शेतकऱ्याची जमीन वाघी खुर्द लघु पाटबंधारे योजनेच्या सांडव्याच्या पुच्छ कालव्यासाठी संपादीत करण्यात आली आहे.
(२) होय.
श्री. वामन सु. भालेराव यांनी जिल्हाधिकारी, वाशिम यांना दि. ६/४/२०१५ रोजी निवेदन दिले आहे.
(३) प्राप्त निवेदनानुसार प्रत्यक्षस्थळाची पाहणी करण्यात आली असून पीकाचे कुठलेही नुकसान झालेले आढळून आले नाही. संबंधीतांची शेती नाल्याच्या तलांकापासून २.५ ते ३ मीटर उंचीवर असल्याने त्यांच्या शेतात पाणी शिरण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. सांडव्याकरीता संपादीत जमीनीजवळ कास्तकऱ्यांच्या शेताचे नुकसान झालेले नाही. सदर प्रकल्पाचे बांधकाम सन १९८९-९० मध्ये पूर्ण झालेले आहे. त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाशिम जिल्ह्यातील शिरपूर जैन येथील पालखी मार्गाची दुरुस्ती करण्याबाबत

**(४२) २५७११ (१७-०८-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरपूर जैन (ता.मालेगांव, जि.वाशिम) येथील बसस्थानक ते जानगिरमहाराज संस्थांन या संत गजानन महाराज शेगांवच्या (शेगांव ते पंढरपूर) पालखी मार्गाची व्यवस्था अत्यंत वाईट झाली आहे हे दिनांक १ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत दोन वर्षात झालेल्या या कामाचे लोखंडी गज उघडे पडले असुन पदचाऱ्यासाठी धोकादायक झाले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पालखीमार्ग दुरुस्ती करण्याची मागणी दिनांक ३० मे, २०१५ चे दरम्यान गावकऱ्यांनी ग्रामपंचायतीकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२४-१०-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे. सदर पालखी मार्गाची अवस्था अत्यंत खराब नाही. तथापि, सदर मार्गावर काही ठिकाणी खड्डे पडले आहेत.
(२) पालखी मार्गाच्या रस्त्याच्या शेवटी, रस्त्यास शेवटी, रस्त्यास छेदून जाणारा नाला आहे. पावसाळ्यामध्ये नाल्यातून वाहणाऱ्या पूराच्या पाण्यामुळे रस्त्याच्या कॉक्रीटचा थर वाहून गेला आहे. त्यामुळे लोखंडी आडव्या सळ्या उघड्या पडल्या आहेत. परंतु त्या पदचाऱ्यांकरीता धोकादायक अवस्थेत नाहीत.
(३) होय.
(४) ग्रामपंचायतीमार्फत रस्त्यावरील खड्डे बुजविण्यात आले आहेत. तसेच सदर रस्त्याची कायमस्वरुपी सुधारणा करण्याबाबत ग्रामपंचायतीकडून कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यातील कासार पाडळी येथे ब्रम्हगव्हाण जलसिंचन योजनेसाठी जमीन दिलेल्यांना शेतीसाठी पाणी व जमिनिचा मोबदला मिळण्याबाबत**

**(४३) २५८३५ (१७-०८-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यातील कासार पाडळी येथे ब्रम्हगव्हाण जलसिंचन योजनेसाठी जमीन दिल्यानंतर सहा वर्षाचा कालावधी लोटला आहे. परंतू अद्यापही शेतीसाठी पाणी व जमिनिचा मोबदलाही मिळालेली नाही. शिवाय दोन भागात विभागणी झाल्याने शेती करण्यास अडचणी निर्माण होत असल्याने शेतक-यांनी ब्रम्हगव्हाण जलसिंचन योजनेसाठी खोदलेले कालवे माती टाकून बुजविण्यात सुरुवात केली असल्याचे माहे मे, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-१०-२०१५)** :(१) अंशत: खरे आहे.

जमिनीच्या दराबाबत एकमत न झाल्याने तसेच पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने भूसंपादन प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही.

प्रगतीपथावरील कालवा खोदाकामात अज्ञात व्यक्तीने अल्प प्रमाणात माती टाकल्याचे निदर्शनास आले.

(२) मे २०१५ मध्ये कासार पाडळी, ता.पैठण, जि.औरंगाबाद गावाच्या शिवारात प्रगतीपथावर असलेल्या व अंशत खोदकाम केलेल्या कालव्याच्या भागात काही प्रमाणात माती टाकल्याचे निदर्शनास येताच क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी स्थळ पहाणी केली. त्याबाबत स्थानिक शेत जमिन मालकांकडे चौकशी केली. मात्र ही माती कोणी टाकली याबाबत निश्चित माहिती मिळू शकली नाही. शासनाने खोदलेला कालवा बुजविण्याचा प्रयत्न केल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची जाणीव आसपासच्या शेतकऱ्यांना करुन देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे पळुज (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील भिमा नदीवर बांधण्यात आलेल्या कोल्हापूरी बंधाऱ्याची दारे खराब झाल्यामुळे बंधाऱ्यास गळती लागल्याबाबत

**(४४) २६२०७ (१७-०८-२०१५). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पळुज (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील भिमा नदीवर बांधण्यात आलेल्या कोल्हापूरी बंधाऱ्याची दारे खराब झाल्यामुळे बंधाऱ्यास मोठ्या प्रमाणात गळती लागल्याबाबतचे निवेदन मा.जलसंधारण मंत्री, सचिव जलसंधारण, जिल्हाधिकारी सोलापूर, अधिक्षक अभियंता, पाटबंधारे विभाग, सोलापूर यांना स्थानिक लोकप्रतिनिधी व स्थानिक नागरीक यांनी माहे एप्रिल, २०१५ मध्ये दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-१०-२०१५)** :(१) नाही.

स्थानिक लोप्रतिनिधीचे कोणतेही निवेदन विभागास प्राप्त झाले नाही. परंतु को.प.बंधाऱ्याची दारे खराब झाल्याने पाणी गळती होत असल्याने सदर दुरुस्तीसाठी कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गडनदी प्रकल्प उजव्या कालव्याच्या मौजे येगांव-आलिमवाडी (ता.चिपळूण) येथे ये-जा करण्यासाठी जोड रस्ता करण्याबाबत**

**(४५) २६३०९ (१७-०८-२०१५). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील लघु पाटंबधारे विभागाच्या अधिपत्याखालील गडनदी प्रकल्प उजव्या कालव्याच्या मौजे येगांव-आलिमवाडी (ता.चिपळून) येथे अलिकडे पलिकडे ये-जा करण्यासाठी जोड रस्ता नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी कालव्यावरुन जोड रस्ता नसल्यामुळे परिसरांतील ग्रामस्थांना दळणवळणाची अत्यंत गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधीत विभागाकडे दिनांक १४ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास पत्र देऊन सदर ठिकाणी जोड रस्ता करणेबाबत कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तदनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) स्थानिक लोकप्रतिनिधींनी मौजे येगांव आलिमवाडी (ता.चिपळून) करिता जोड रस्ता करणेबाबत क्षेत्रीय कार्यालयास कळविले आहे. तथापि गडनदी मध्यम प्रकल्पाच्या उजवा कालवा किमी १४ मध्ये सा.क्र. १३/८५० मी. जवळ कालव्याच्या वरील बाजूस आलमवाडीची वस्ती आहे. उजवा कालवा किमी १ ते १५ मध्ये जुन्या ३९ पायवाटांच्या ठिकाणी पदसेतू (Foot Bridge) व रस्त्याच्या ठिकाणी पाच गावरस्ते पूल (V.R.B) बांधण्यात आलेले आहेत. सद्यस्थितीत उजवा कालव्यावर कि.मी १४ व कि.मी १५ वर अनुक्रमे सा.क्र. १३/५६० व सा.क्र. १४/७५० या ठिकाणी दोन गावरस्ते पूल (V.R.B) अस्तित्वात आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील पाटबंधारे महामंडळाकडील वाहनांवर मागील दहा महिन्यात पेट्रोल डिझेलवर व अन्य बाबींवर झालेल्या खर्चाबाबत**

**(४६) २६५९५ (१७-०८-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पाटबंधारे महामंडळाकडील वाहनांवर मागील दहा महिन्यात पेट्रोल डिझेलवर व अन्य बाबींवर झालेल्या खर्चाचा सविस्तर तपशील देण्याचे आदेश जलसंपदा मंत्र्यांनी दिनांक ४ किंवा ५ जानेवारी, २०१५ रोजी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मंत्र्याच्या आदेशानुसार सदर तपशील सादर केला आहे काय,

(३) असल्यास, सदर तपशीलामध्ये कोणकोणत्या प्रमुख आक्षेपार्ह बाबी आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.

तथापि शासन पत्र दि. २४.२.२०१५ नुसार शासनाने सर्व ५ महामंडळाकडून मागील ५ वर्षाचे (सन २०१०-११ ते २०१४-१५) इंधन व दुरुस्ती खर्चाची माहिती मागविली होती.

(२) ५ पैकी ३ पाटबंधारे विकास महामंडळाकडून पूर्ण माहिती प्राप्त झालेली आहे. उर्वरित २ महामंडळाकडून अंशत: माहिती प्राप्त झाली आहे.

(३) प्राप्त झालेल्या तपशीलाची छाननी चालू आहे.

---

## राजापूर तालुक्यातील टंचाईग्रस्त गावांना अर्जुना मध्यम पाटबंधारे प्रकल्पाचे पाणी पाईपद्वारे पुरविण्याबाबत

**(४७) २६७३८ (१७-०८-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्जुना मध्यम पाटबंधारे प्रकल्पाचे पाणी पाईपद्वारे राजापूर तालुक्यातील पाणी टंचाईग्रस्त सर्व गावांना प्रकल्प पुर्ण होताच पुरविण्यात आल्याने तालुक्यातील लाखो एकर जमिन सिंचनाखाली येईल असे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने काय निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-१०-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे. सदर प्रकल्पातून राजापूर तालुक्यामधील १४ गावातील ४३०८ हेक्टर तसेच लांजा तालुक्यातील १३९६ हेक्टर असे एकूण ५७०४ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

(२) अर्जुना मध्यम प्रकल्पाच्या धरणाचे काम सन २०११-१२ मध्ये पूर्ण असून धरणांमध्ये पूर्ण क्षमतेने पाणीसाठा करण्यात आला आहे. या प्रकल्पास पाईपलाईन ऐवजी कालव्याद्वारे सिंचन सुविधा उपलब्ध करण्यात येत आहे. सद्यस्थितीत प्रकल्पांतर्गत डावा कालवा कि.मी. १ ते १६ व उजवा कालवा कि.मी. १ ते १७ मधील कामे प्रगतीपथावर आहेत. माहे जून २०१५ मध्ये डावा कालव्याच्या कि.मी १ ते ३ पर्यंत पाणी सोडून कालव्याची चाचणी घेण्यात आली आहे.

या प्रकल्पास सन २०१५-१६ या वर्षात अर्थसंकल्पात रु. १६ कोटींची तरतूद आहे. प्रकल्पाचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

प्रकल्पाची उर्वरित कालव्यांची व वितरण प्रणालीची कामे निधीच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील १४८ अवर्षण प्रवण तालुक्यासाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याबाबत

**(४८) २६७४४ (१७-०८-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १४८ अवर्षण प्रवण तालुक्यांसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याबाबत व्ही.रंगनाथन समितीने सादर केलेला अहवाल शासनाने नियुक्त केलेल्या केळकर समितीस अभिप्रायर्थ उपलब्ध करुन देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत केळकर समितीने शासनास सादर केलेल्या अभिप्रायाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-१०-२०१५) :**(१) व (२) व्ही रंगनाथन यांच्या अध्यक्षतेखालील अवर्षणप्रवण तालुके सिंचन अनुशेष समितीचा अहवाल डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखालील समतोल प्रोदशिक विकास उच्चस्तरीय समितीला उपलब्ध करण्यात आला होता हे खरे आहे. समतोल प्रादेशिक विकास उच्चस्तरीय समितीने अवर्षण प्रवण तालुक्यांसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्यासंदर्भातील शिफारस केलेली नाही. तथापि प्रादेशिक विकास उच्चस्तरीय समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशी व त्याअनुषंगाने प्रशासकीय विभागाचे अभिप्राय विचारात घेऊन अहवालातील शिफारशी स्विकारण्यासंदर्भात अहवाल सादर करण्यासाठी मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी मंत्रीमंडळ उप समिति गठीत करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नांदूरमध्यमेश्वर (जि.नाशिक) धरणाचा उजवा व डावा कालव्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(४९) २६८६६ (१७-०८-२०१५). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदूरमध्येमेश्वर (जि.नाशिक) धरणाचा उजवा व डावा कालवा अतिशय जीर्ण झाला असून या कालव्यात पानवेलीसह काटेरी झुडपाने व्यापलेले असून हा कालवा केव्हाही फुटण्याच्या स्थितीत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची तक्रार संबंधित विभागाकडे करुनही दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-१०-२०१५)** :(१) हे खरे नाही.

तथापि गोदावरी कालव्यांची कामे सन १९११ ते १९१६ या कालावधीत पूर्ण झालेली आहेत व सदरील बांधकामांना १०० वर्ष पूर्ण झाली असून त्यांचे उपयुक्त आयुष्य संपलेले असल्याने कालव्यांवरील मातीकाम व सर्व ३६४ बांधकामाचे मजबुतीकरन/पुर्नबांधणी करणे आवश्यक ठरले आहे.

पानवेलीसह काटेरी झुडुपे काढणे व तात्पुरती दुरुस्ती इ. कामे वेळोवेळी करण्यात येत असून नुतणीकरणांतर्गत बांधकामांचे मजबूतीकरण व नविन बांधकामे करण्यात येत आहेत.

(२) हे खरे नाही.पानवेलीसह काटेरी झुडपे काढणे व तात्पुरती दुरुस्ती इ. कामे वेळोवेळी करण्यात येत आहेत.

(३) सन १९८६ ते २०१३ पर्यंत गोदावरी कालवे नुतनीकरणाच्या २८५६ सघमी मातीकाम व ७४ बांधकामे पुर्ण झाली असून मजबुतीकरण व नव्याने बांधावयाच्या ४७ कामांच्या प्रस्तावास दि. ०६.०८.२०१२ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर कामांची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर असून निधीच्या उपलब्धतेनुसार टप्याटप्याने उर्वरित कामे व मातीकाम पूर्ण करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लोअरपुल प्रकल्प वेणी (ता.महागांव, जि.यवतमाळ) येथील कार्यकारी अभियंत्यांनी हेडवर बिले काढून शासकीय रक्कमेचा अपहार केल्याबाबत

**(५०) २७७०६ (१७-०८-२०१५). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोअर पुस प्रकल्प वेणी (ता.महागांव, जि.यवतमाळ) या प्रकल्पाच्या कॅनॉलचे बांधकाम ० ते ६२ कि.मी.पर्यंत करण्यात आले आहे परंतु ३९ कि.मी.चे समोर कॅनॉलची कामे निकृष्ट असल्यामुळे ओलीतासाठी पाणी शेतक-यांना देण्यात आले नाही हे खरे आहे काय,

(२) मागील २५ वर्षापासून दरवर्षी रब्बी हंगामात पाणी सोडण्याअगोदर कॅनॉलमधील ० ते ६२ कि.मी.पर्यंत गाळ काढणे, झाडे झुडुपे तोडणे व दुरुस्ती या शिर्षकाखाली दरवर्षी लाखो रुपयांची बिले काढण्यात आली हे खरे आहे काय, या प्रकल्पाची ओलीताची क्षमता दहा हजार हेक्टर असतांना दोन हजार हेक्टर ओलीत होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, क्षमतेपेक्षा ओलीत कमी होण्याचे कारण काय,

(४) सन २०१२-१३, १३-१४ व १४-१५ लोअर पुल प्रकल्पाच्या मुख्य गेटवर लाईट, लाईनफीटींग, कर्मचारी वसाहतीची दुरुस्ती विश्रामगृहाची दुरुस्ती अशा शीर्षकाखाली लाखो रुपयाची बिले काढण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-१०-२०१५) :**(१) नाही. लोअर पुस प्रकल्पाचा ५० कि.मी. मुख्य कालवा व पुढे १२.५० कि.मी. वितरिका असून सद्यस्थितीत मुख्य कालवा कि.मी. ५० पर्यंत व पुच्छ वितरिका कि.मी.६ पर्यंत शेतकऱ्यांना ओलितासाठी पाणी देण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही.

या प्रकल्पाची सिंचन क्षमता ९११० हेक्टर असून मागील ५ वर्षातील महत्तम सिंचन ५५२६ हेक्टर झाले आहे.

(३) धरणामध्ये उपलब्ध असलेला पाणीसाठा व सिंचनाच्या प्राप्त मागणीनुसार सिंचन करण्यात येत आहे.

(४) नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.